महाराष्ट्र पोलीस

M.I.D.C Police Station, Jalgaon,
Dist.Jalgaon, Maharashtra
एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन, जळगांव ता.जि.जळगांव महाराष्ट्र
Ph. No.02557- 2210500. Email ID- pstn.midc@gmail.com.

-- प्रेस नोट --

प्रति, दिनांक. १५/०४/२०२६

मा.संपादक

---------------------------------

विषय - गावठी कट्टा व धारदार कोयता अशा घातक हत्यारांसह दहशत माजविण्याच्या उद्देशाने फिरणारे दोन ईसम एमआयडीसी पोलीस स्टेशन जळगाव कडुन जेरबंद.

----ooo----

जळगाव शहरातील कासमावाडी परिसरात दोन ईसम गावटी कट्टा व धारदार कोयता अशा घातक हत्यारांसह दहशत माजविण्याच्या उद्देशाने फिरत असले बाबतची गोपनिय बातमी दि.१४/०४/२०२६ रोजी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना प्राप्त झाली. सदर गोपनीय बातमीच्या अनुषंगाने पोनि बबन आव्हाड यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोस्टेचे गुन्हे शोध पथकाचे पोउनि राहुल तायडे, पोउनि चंद्रकांत धनके, पोहेकॉ प्रमोद लाडवंजारी, पोहेकॉ गिरीश पाटील,पोहेकॉ किरण चौधरी, पोकॉ रमाकांत साळुंखे, पोकॉ शशिकांत मराठे,अशांचे पथक नेमुण सदर पथकास योग्य त्या सुचना देवुन कारवाई करणे बाबत आदेशित केले.

वर नमुद गुन्हे शोध पथकान तात्काळ जळगाव शहरातील कासमावाडी, नेरी नाका, स्मशानभुमी भागात गोपनिय माहिती काढून शोध घेत असतांना कासमावाडी ते नेरी नाका रोडवरील एकता चौका जवळील मोकळ्या पटांगणात एक मोटर सायकलवर दोन ईसम येतांना दिसले असता त्यांना वाहन थांबवण्याचा ईशारा केला असता वाहन न थांबवता पळण्याचा प्रयत्न करीत असतांना सदर पथकाने शिताफीले सदर वाहन थांबवुन वाहन चालकास विचारपुस करुन त्यांच्या अंगझडती मध्ये कमरेला एक गावठी बनावटीचा कट्टा व वाहनाच्या मागील बसलेल्या दुस-या ईसमाच्या अंगझडतीमध्ये एक लोखंडी धारदार कोयता व गावठी कट्टयाचे रिकामे मॅकझील मिळुन आल्याने सदर संशयित ईसमांना पंचासमक्ष नाव गाव विचारता त्यांनी अनुक्रमे १) रोहीत गोपाळ कुंवर वय २२, रा अष्टभुजा देवी मंदीर जवळ, कासमवाडी व २) सागर रामा सोनवणे वय २१, रा मेस्का माता नगर, आसोदा रोड जळगाव असे सांगितले. सदर ईसमांना ताब्यात घेवुन एमआयडीसी पोलीस स्टेशन सिसिटिएनएस क्रं.२८९/२०२६, भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३/२५,४/२५, सह मोटर वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर ईसम १) रोहीत गोपाळ कुंवर वय २२, रा अष्टभुजा देवी मंदीर जवळ, कासमवाडी व २) सागर रामा सोनवणे वय २१, रा मेस्का माता नगर, आसोदा रोड जळगाव यांच्याकडून हस्तगत करण्यात आलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालीलप्रमाणे,

१) २०,०००/- रुपये किमतीचे एक गावठी बनावटीचे कट्टा कि.अं.जु.वा.
२) ५०,०००/- रुपये किमतीचे बजाज पल्सर मोटर सायकल कि.अं.जु.वा.
३) ००.००/- रुपये किमतीचा एक धारदार लोखंडी पाते असलेला कोयता कि.अं.जु.वा.
४) ५००/- रुपये किमतीचा एक गावठी कट्याचे लोखंडी धातुचे रिकामे मॅकझीन कि.अं.जु.वा.

------------------------------------------

एकुण - ७०,५००/-

सदर आरोपीतांना अटक करुन मा. न्यायालयात हजर केला असता त्यांना ०१दिवसाची पोलीस कस्टडी देण्यात आली आहे. सदर गुन्हाचा तपास पोहेकॉ किरण चौधरी व पोकॉ योगेश घुगे करत आहे.

सदरची कारवाई डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक जळगाव, मा.संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक जळगाव, मा.नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव भाग, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.

पोलीस निरीक्षक
एमआयडीसी पो.स्टे.जळगांव


एम.आय.डी.सी.
पोलीस स्टेशन जळगाव
फोन नं. 0257 - 2210500 / 2210163
SMART POLICING
एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जळगाव
WARNING
CCTV